# अनुक्रमणिका

प्रस्तावना

रसपरिपोषक निसर्ग

निसर्गाचे मानवीकरण

सूचक निसर्ग

अलंकार स्वरूप निसर्ग

संकेत स्वरूप निसर्ग

आणखी काही निसर्ग

समारोप

निसर्ग छल

सिद्धान्त नाट्याच्या अनुषंगाने सांगितला आहे.

नाट्याची उभारणी चार अभिनयांवर झाली. अभिनय म्हणजे नटाने आपले भाव उत्तम त-हेने व्यक्त करण्याची पध्दती.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

हे अभिनय पुढीलप्रमाणे —

१] सात्विक, २] आंगिक, ३] वाचिक, ४] आहार्य.

सात्विक अभिनयात नटाने आपल्या निरनिराळ्या मनोविकारांच्या द्वारे मूळ भूमिकेचे हृद्गत व्यक्त करावयाचे. हा सात्विक अभिनय सांगताना भरताला रसविवेचन करावे लागले. [नाट्यशास्त्र ६/७ अध्याय] शृंगारादि अष्टरस [ना. शा. ६. १५] आठ स्थायी भाव [६. १८] तेहत्तीस व्यभिचारी भाव [६. १९ ते २२] व आठ सात्विक भाव [६. २३] अशी चर्चा नाट्यशास्त्रात आली आहे.

नाटकाच्या अंगोपांगात भरताने रसालाच मुख्य स्थान दिले आहे. अभिनय, वृत्ती, प्रवृत्ती स्वर, वाद्य, गान, रंगभूमी सजावट या सर्वांचा विनियोग अखेरीस रसातच आहे. असे भरताचे मत आहे. प्रेक्षकांच्या व्याख्येतही त्यांच्या भावनांवर होणाऱ्या परिणामावरच त्याने मुख्य कटाक्ष ठेवला.

आता ही रसनिर्मिती कशी होते याची चर्चा करणे इष्ट ठरेल. "जिचा प्रवाह अविच्छिन्न आहे, अखंड आहे, जिच्यात स्थैर्य आहे, चांचल्य नाही अशी भावना म्हणजे अंत:करण वृत्ती तिला स्थायिभाव अशी संज्ञा. हा स्थायिभाव जेव्हा काव्यात, नाटकात व्यक्त होतो तेव्हा त्याला रस म्हणतात.

"तत्र विभावानुभावव्यभिचारिसंयोगाद्रसनिष्पत्ति:" विभाव अनुभाव आणि व्यभिचारिभाव यांच्या संयोगाने रस निष्पत्ती होते. असे भरतमुनी म्हणतात. [ना. शा. ६. ३४] [आधारित]

विभाव दोन प्रकारचे असतात. १] आलंबन २] उद्दीपन.

उद्दीपन विभावांच्या स्वरूपात रसपरिपोषात्मक निसर्ग आपल्याला दिसतो.

रसांचे नऊ प्रकार मानले असून शृंगार हा प्रधानरस मानला आहे. या शृंगाराचा सखा ऋतुवसंत हा जवळ जवळ सर्व संस्कृत नाटकात आपल्याला भेटतो. निसर्ग एकच पण परस्परविरोधी भूमिका करणारा असे ही निसर्गाचे स्वरूप नाटयात साकार झालेले दिसते. उदा. प्रियसखा जवळ असतानाचा निसर्ग हा मीलनकाळी सखा वाटतो तर विरहकाळात तोच निसर्ग दुष्ट शत्रू भासतो. या प्रकाराचे कांहयाचेच उदा. घ्या.

स्त्री पुरूषांची परस्परप्रेमभावना ही या जगातील अत्यंत साहजिक आणि स्वाभाविक भावना आहे. हीच भावना सृजनाचा आधार आहे. म्हणूनच प्रणयप्रधान नाटके रसिकांच्या पसंतीला उतरली असावीत. अशी प्रणयप्रधान नाटके संस्कृतातही बरीच आहेत.

कालिदासाची नाटके शृंगाररस प्रधान आहेत. कालिदासाची एक श्रेष्ठ कलाकृती म्हणून प्रथम "अभिज्ञानशाकुंतलम्" या नाटकातील निसर्गाचा रसानुषंगिक आविष्कार पाहू —
अभिज्ञान शाकुन्तलाच्या पहिल्याच अंकात शृंगाररसाचा उदय कसा झाला हे लक्षापूर्वक पाहण्यासारखे आहे.

मृगया करीत करीत अरण्यातील तपोभूमीत राजा दुष्यन्त प्रवेश करतो. त्याला एक हरीण दिसतो. त्या हरणावर राजा बाण सोडणार एवढयात —

न खलु न खलु बाणा: सन्निपात्योऽयमस्मिन् ।
मृदुनि मृगशरीरे पुष्पराशाविवाग्नि: ।
क्व बत हरिणकानां जीवितं चातिलोलं ।
क्वच निशितनिपाता वज्रसारा: शरास्ते ।। १०. १ शा.

छे। छे। हरणांच्या कोमल शरीरावर क्रूर्‍या बाणांचा मारा करू नकोस। फुलांच्या राशीत अग्नी टाकावा तसे होईल. अशी एका आश्रमवासी तापसाची हाक त्याला ऐकू येते. येथे शस्त्रायोजनेचे वातावरण बदलले आणि मृदुमृगशरीर, पुष्पराशी या सारख्या शब्दांनी शृंगाररसाचा उद्दीपन विभाव सिध्द झाला. शृंगाररस सूचक असे हे शब्द सहजपणे वातावरणनिर्मिती करून जातात. पुढे मृदुशरीरिणी पुष्पकोमला शकुंतला राजापुढे अशी ठाकणार आहे. आणि त्याचे अग्निबाण नव्हे तर मदनबाण ह्या कुसुमकोमलेला विद्ध करणार आहेत. असा सूचक अर्थ ही येथे अभिप्रेत आहे. संयत अशा तपोभूमीतही निसर्गाला मदनसखा बनवून शृंगाराला पोषक असे वातावरण कवीने निर्मिले आहे.

पुढे एक तापस सांगतो की आश्रमात शकुंतला एकटी आहे. कण्व नाहीत. त्यावेळी उद्दीपन विभावात भर पडते. राजाला आश्रमाजवळील उद्यानात ऋषिकन्यका दिसतात व त्यांना पाहून तो "अहो मधुरमासां दर्शनम्" असे उद्गार काढतो. या दर्शनि माधुर्यात शृंगाररस उत्पन्न होण्याचे पूर्व चिन्ह आहे हे उघड आहे.

शकुंतलेचे प्रथम दर्शन होताक्षणीच तिच्या अद्वितीय रूपाने राजा वेडावून गेला आणि त्याच्या तोंडून तिच्या अकृत्रिम सौंदर्याचे वर्णन बाहेर पडले.

"शुद्धान्तदुर्लभमिदं वपुराश्रमवासिनो यदि जनस्य
दूरीकृता: खलु गुणैरुद्यानलता वनलताभि: ।। १७. १ शा.

शकुन्तलेच्या सौंदर्याची तुलना राजा तत्काळ राजवाडयातील अंत:पुरातील स्त्रियांशी करतो. त्या राजसौंदर्याला ही मागे टाकणारे असे

हे सौंदर्य या आश्रम कन्येकडे आहे असाच त्याच्या बोलण्याचा भावार्थ आहे. हे सांगण्यासाठी तो निसर्गाची मदत घेतो. उद्यानलता आणि वनलता अशा शब्दात राजस्त्रिया आणि शकुंतला व तिच्या मैत्रिणी यांची तुलना करतो. येथे या वनलतेने उद्यानलतांना मागे सारुन राजमनावर ताबा मिळविला. कालिदासाने यासाठी नायक नायिकेच्या प्रथम भेटीसाठी ठिकाण शोधले ते ही तपोवनातील रम्य वनश्रीच्या संन्निधत. प्रेमकिशोर झालेला राजा दुष्यन्त आश्रमात जाण्यास आतुर झाला अशा तऱ्हेने शिकारीसाठी आलेला राजा स्वत:च शिकार बनला. येथे शृंगाररसपरिपोषासाठी निसर्ग अवतीर्ण झाला आहे. उद्दीपन विभावाखेरीज केवळ आलंबन विभावाने रसनिष्पत्ती होत नाही.

हा शृंगाररस चार ठिकाणी निर्माण होतो प्रथम तो कविमनात, तेथून तो काव्यात शिरतो. तेथून त्याचे प्रयाण होते नटाच्या मनात व शेवटच्या टप्प्यावर तो उतरतो रसिक हृदयात। यातील पहिली तीन ठिकाणे कारणरुप आहेत. व चौथे ठिकाण कार्यरुप आहे. नायक व नायिका एकत्र असतात तेव्हा तो संभोग शृंगार आणि ते दुरावतात तेव्हा विप्रलंभ शृंगार. असे दोन प्रकार मानले आहेत. विप्रलंभ शृंगार साधण्यासाठी कालिदासाने विरही दुष्यन्ताच्या मदतीला निसर्ग धाडला आहे. निसर्गवर्णनातून दुष्यन्तमनातील कामवेदनाचे चित्र प्रेक्षकांच्या मन:फलकावर उतरते. म्हणूनच येथे निसर्ग हा मदनसखा बनला आहे, असे म्हणावेसे वाटते.

शकुंतलेच्या भेटीसाठी दुष्यन्ताचे मन आतुर झाले आहे. सर्व चराचर सृष्टी बदलल्याचा त्याला भास होत आहे. तो मदनाला म्हणतो आहे. --

"भगवन् कुसुमायुध, त्वया चन्द्रमसा च विश्वसनीयाभ्यामतिसंधी-यते कामिजनसार्थः । कुतः

तव कुसुमशरत्वं शीतरश्मित्वमिन्दो —
र्द्वयमिदमयथार्थं दृश्यते मद्विधेषु ।।
विसृजति हिमगर्भैरग्निमिन्दुर्मयूखै: ।
त्वमपि कुसुमबाणान्वज्रसारी करोषि ।।

हे भगवान मदना, तू आणि चंद्र दोघेही प्रेमिकांना विश्वासार्ह वाटता. पण तुम्ही मात्र त्यांची वंचनाच करता प्रेमिक तुम्हाला नाजूक शीतल समजतात पण तुझे बाण आणि चंद्राचे शीतल समजतात पण तुझे बाण आणि चंद्राचे शीतल किरण या दोन्ही गोष्टी माझ्या सारख्या वियोगी प्रेमिकाच्या बाबतीन विपरीत ठरतात. कारण अंतर्भागी शीतल असलेल्या किरणांनी चंद्र अग्नीची वृष्टी करतो आणि तू सुद्धा आपले फुलांचे बाण वज्राप्रमाणे कठोर करतोस। येथे नायक दुष्यन्त विरहावस्थेत वावरत आहे. म्हणून त्याला आपल्या मनोवृत्तीनुसार समोरचा निसर्ग बदलल्यासारखा वाटतो. नेहमी प्रेमिकांना हवाहवासा वाटणारा चंद्र विरही दुष्यन्ताला दाहक वाटतो. चंद्र तोच आहे चांदणे तेच आहे पण तरी ही बदलत्या मनोभावनेनुसार निसर्ग बदलल्याचा भास होत आहे.

पहिल्या अंकात दुष्यन्ताने शकुंतलेस व शकुंतलेने दुष्यन्तास पाहिल्याबरोबर त्यांच्यामध्ये प्रणयाची भावना अंकुरित झाली व ती वाढीस लागली. तिची परिणती तिसऱ्या अंकातील मीलनात झाली आहे. पहिल्या व तिसऱ्या अंकात नायक व नायिका परस्परांजवळ असल्याने संभोगशृंगार आहे. व दुसऱ्या अंकात राजा प्रेमविव्हल झाला असून विरहावस्थेत शकुंतलेचे स्मरण करीत आहे तेथे विप्रलंभ शृंगार आहे.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

कडक उन्हाची वेळ शाकुंतला आपल्या मैत्रिणींसमवेत लता-कुंजांनी गजबजलेल्या मालिनीच्या तीरावर घालविते. आपण ही तिकडेच जावे असा विचार करुन राजा दुष्यन्त शाकुंतलेला भेटण्याच्या अनिवार इच्छेने तेथे जातो -

शक्यमरविन्दसुरभि: कणवाही मालिनीतरङ्गाणाम्।
अङ्गैरनङ्गतप्तैरविरलमालिङ्गितुं पवन: ।।

मालिनीतरंगातील तुषारकणा उधळणारा आणि कमळांमुळे सुगंधित झालेला वारा जणू काही राजा दुष्यन्ताला दृढालिंगन देत आहे. येथे तो सुगंधी वारा, शीतल वारा नायकाच्या मनात नायिकेच्या भेटीची इच्छा निर्माण करतो. वातावरण निर्मिती करतो. म्हणून हा निसर्ग उद्दीपन विभावात मोडतो.

तसेच सहाव्या अंकातही अंगुलियक दर्शनाने राजाची शाकुंतला-विषयक स्मृती जागृत होते. व तिच्या विरहाने, पश्चातापाने तो होरपळू लागतो.

मुनिसुताप्रणयस्मृतिरोधिना
मम च मुक्तमिदं तमसा मन: ।
मनसिजेन सखे प्रहरिष्यता
धनुषि चूतशरश्च निवेशित: ।।

राजाची व्याकूळ अवस्था त्यातच वसंतऋतूचे आगमन।
कामदेवाने आपले धनुष्य पुन्हा सज्ज केले आणि राजाच्या मनातील विरहवेदना मंद झाल्या.

येथील तपोवनाचा वसंतकालीन निसर्ग राजाच्या मनातील रति-भावांना पुष्टी देणारा उद्दीपन विभाव ठरला आहे. नायिका जवळ

नसल्याने येथे विप्रलंभ शृंगार आहे. आपले विरह व्याकूळ मन रिझविण्यासाठी राजा पूर्वीचे प्रेमप्रसंग चित्रांकित करण्याचा प्रयत्न करतो. त्यातही निसर्ग माध्यमातूनच शृंगाररसाची अभिव्यक्ती झालेली दिसते.

कार्या सैकतलीनहंसमिथुना स्त्रोतोवहा मालिनी,
पादास्तामभितो निषण्णहरिणा गौरीगुरो: पावना: ।
शाखालम्बितवल्कलस्य च तरोर्निर्मातुमिच्छाम्यध:
श्रृंगे कृष्णमृगस्य वामनयनं कण्डूयमानां मृगीम् ।। १७ ६ शा.

चित्रात हंसमिथुनयुक्त मालिनी नदी, हरीण विसावले आहेत अशा हिमालयाच्या टेकडया, फांद्यांवर वल्कले लोंबत आहेत अशा झाडांच्या सावलीत काळविटाच्या शिंगावर डावा डोळा घासणाऱ्या हरिणीचे चित्र काढण्याची इच्छा राजा प्रदर्शित करतो. हंसमिथुन, काळवीटहरिणी यांच्या मीलन सूचक चित्रातून राजा आपली मनोव्यथा चित्रित करू पाहतो आहे. पूर्व स्मृतीतच रममाण होण्याचा त्याचा प्रयत्न चालू आहे. आपल्या एकाकी पणाची जाणीव त्याला सलते आहे.

कृतं न कर्णार्पितबन्धनं सखी
शिरीषमागण्ड विलम्बि केसरम्
न वा शरच्चन्द्र मरीचि कोमलं
मृणाल सूत्रं रचितं स्तनान्तरे ।। १८. ६ शा.

अद्याप गालापर्यंत पराग लोंबणारे कानावर खोवलेले शिरीषाचे फूल काढले नाही तसेच शरदातील चंद्रकिरणा प्रमाणे सुकुमार असलेले मृणालसूत्र तिच्या स्तनांच्या मध्यभागी दाखविले नाही. अशा प्रकारे राजा या स्मृतिचित्रात अगदी गुंग होऊन गेला आहे. वरील दोन श्लोकात आलेला निसर्ग शृंगारानुभाव सूचक आहे. हंसमिथुनाचा उल्लेख राजाच्या चिंतनाचे

द्योतक आहे. आणि हरिणीने आपला वामनेत्र काळविटाच्या शिंगावर घासणे या गोष्टी तन्मयतेचे द्योतक आहेत. काळवीट थोडा जरी हलला तरी हरिणीचा डोळा फुटणार आहे. पण असे काहीच घडत नाही. त्याच तन्मयतेने राजा स्मृतिचित्रात गढून गेला आहे. तेथे उपस्थित असलेल्यापैकी कोणालाच ते चित्र असल्याचे भान राहिले नाही. पुढील श्लोकात निसर्गाची ही तन्मयता शिगेला पोहोचली आहे.

> अक्लिष्ट बालतरुपल्लव लोभनीयं
> पीतं मया सदयमेव रतोत्सवेषु – ।
> बिम्बाधरं स्पृशसि चेद्भ्रमर प्रियाया-
> स्त्वां कारयामि कमलोदरबन्धनस्थम् ।। २०६ शा.

एखाद्या कोवळ्या रोपाच्या तजेलदार पालवी प्रमाणे गोंडस असलेल्या आणि प्रणयक्रीडांच्या वेळी मी अगदी हळुवारपणे चुंबिलेल्या या माझ्या प्रियेच्या लालसर अधराला जर तू स्पर्श केलास तर तुला कमळाच्या कोशात कोंडून ठेवीन मी !

शकुंतलेच्या वदनपुष्पाभोवती रुंजी घालणारे भ्रमर, कमळाच्या कोशात अडकणारे भ्रमर, भ्रमरावर अनुरक्त असलेली तृषित पण व्रतस्थ भ्रमरी या सर्वात विप्रलंभ शृंगार ओतप्रोत भरून राहिला आहे.

सातव्या अंकात त्याच्या पुनर्मीलनानंतर त्यांच्यामध्ये एका उच्च आणि विशुध्द पातळीवर पुन्हा संभोग शृंगाराच्या गडद छटा निर्माण झाल्या आहेत.

> स्मृतिभिन्न मोहतमसो दिष्टया प्रमुखे स्थितासि मे सुमुखि ।
> उपरागान्ते शशिनः समुपगता रोहिणी योगम् ।।२२. ७

महद्भाग्याने स्मृती जागृत झाल्याने, मोहरूपी अंधार लयाला गेल्याने मजसमोर हे सुवदने तू उभी आहेस ग्रहण सुटताच चंद्राबरोबर रोहिणीचे मीलन झाले आहे.

येथे स्पष्टपणे शृंगार रसाची प्रचीती येते.
ऋतुसमवायचिह्नं प्रतिपद्यतां लता कुसुमम् । ऋतुशी झालेल्या मीलनाचे प्रतीक म्हणून लतेने हे कुसुम धारण करावे. अशा शब्दात निसर्गाच्या माध्यमातून राजाने शाकुंतलेचे आपल्याशी मीलन व त्याचे प्रतीक म्हणून पुन्हा तीच अंगठी धारण करावी ही इच्छा व्यक्त केली आहे. फूल म्हणजे वेलीचा दागिनाच. तसाच हा दागिना तू धारण करावास. अशा त-हेचे मनोगत येथे राजा व्यक्त करतो.

अशा प्रकारे प्रेमांकुर मनात रुजण्यापासून ते त्याची परिणती विवाहात, विरहात, पश्चातापात, पुनर्मीलनात होईपर्यंत रसपरिपोषणासाठी निसर्गाने केलेले साहाय्य अतिमोलाचे म्हणावे लागेल.

शाकुन्तलाप्रमाणेच विक्रमोर्वशीयातही प्रणयप्रधानता दिसून येते. पहिल्या अंकात संभोग शृंगार असून तिस-या अंकातही तोच शृंगार रस दिसून येतो. दुस-या अंकात विप्रलंभ शृंगार असून त्याचा खरा सुंदर आविष्कार संबंध चौथ्या अंकात झाला आहे. या अंकात राजा उन्मादावस्थेत असून उर्वशीचा शोध करीत आहे. तो जो कोणी प्राणी भेटेल त्यास उर्वशीची माहिती विचारतो. शृंगारातील रतिभावनेवर संशय, असूया ईर्षा अमर्ष इ. अनेक व्यभिचारी भाव प्रसंगपरत्वे तरळतांना दिसतात.

शृंगाराच्या अनेक व्यभिचारी भावांपैकी उन्माद हा एक होय. हा संभोग या प्रकारातही असतो आणि विप्रलंभातही असतो. विक्रमोर्व-
-शीयातील या शृंगाररसदर्शनामध्ये निसर्गाने कितपत सहभाग घेतला आहे ते पाहू-

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

यदिदं रथसंक्षोभादङ्गेनाङ्गं ममायतेक्षणया ।
स्पृष्टं सरोमकण्टकमङ्कुरितं मनसिजेनेव ।। १३. १ वि.

रथाच्या धक्क्यामुळे विशालाक्षी उर्वशीच्या अंगाचा स्पर्श माझ्या शरीराला झाला आणि अंगावर रोमांच उभे राहिले. असे वाटते की कामभावनेलाच अंकुर फुटला आहे. येथे उर्वशी आणि पुरुरवा यांच्या मनातील रतिभावाचे अंकुरण कामाच्या रूपाने सांगितले आहे. म्हणून निःसंशय हे ठिकाण शृंगाररसाचे आहे. या पहिल्या अंकात संभोगशृंगार आणि विप्रलंभशृंगार यांचा जणू पाठशिवणीचा खेळच चालू आहे.

एषा मनो मे प्रसभं शरीरात्
पितुः पदं मध्यममुत्पतन्ती ।
सुराङ्गना कर्षति खण्डिताग्रात् ।
सूत्रं मृणालादिव राजहंसी ।। २०. १ वि.

आकाशमार्गाने जाणारी ही उर्वशी शरीरातून माझे मन बळजोरीने ओढून नेत आहे. जसे राजहंसी कमळाच्या देठातून कमलतंतू ओढून आकर्षून नेते. राजाचे मन उर्वशी आकर्षून घेते हे सांगण्यासाठी कमलतंतूचे उदा. देऊन निसर्ग माध्यमातून विप्रलंभ शृंगाराची छटा निर्माण केली आहे. प्रियसखी उर्वशी समोर नसली तरी तिचा विचार काही राजाच्या मनातून जात नाही.

आदर्शनात् प्रविष्टा सा मे सुरलोक सुन्दरी हृदयम्
बाणेन मकरकेतोः कृतमार्गमवन्ध्यपातेन ।।२. २

"कामदेवाने आपल्या अमोघबाणाद्वारे बनविलेल्या मार्गाने ती अप्सरा पाहताक्षणीच माझ्या मनात सामावून गेली."
मदनाचाबाण आणि उर्वशी दोन्ही एकाच मार्गाने मनात शिरले. उत्तरोत्तर शृंगाराचा रंग गहिरा बनत चाललेला पुढील उदाहरणावरून पाहूया -

अनविगतमनोरथस्य पूर्वं
शतगुणितेव गता मम त्रियामा ।
यदि तु तव समागमे तथैव
प्रसरति सुभ्रु ततः कृती भवेयम् ।। २२. ३

"हे चारुमलके, माझी इच्छा पूर्ण होण्यापूर्वी रात्री शतपटीने प्रदीर्घ भासत होत्या आता तुझ्या मीलनानंतर त्या तशा प्रदीर्घ होतील, तर मी कृतार्थ होईन"

रात्रीच्या उल्लेखाने राजाने खुबीदारपणे वियोगकालीन रात्रीं जाणवणारी विरहव्याकुलता आणि आता मीलनाने निर्माण होणारी प्रणयपूर्तता सूचित केली आहे. येथे पूर्वार्धात विप्रलंभ शृंगार तर उत्तरार्धात संभोगशृंगार आहे. या श्लोकात झालेला दोन्ही शृंगारांचा संगम साहित्यिक दृष्टया पुरुरवा उर्वशी मीलनासारखाच उत्कट वाटतो.

अशा उत्कट वातावरणात दोघे असतांना दोघांचा पुन्हा वियोग होतो. उर्वशी लतारूप बनते. आणि कालिदासाच्या प्रतिभेला विप्रलंभ शृंगाराची धार चढते. उर्वशीच्या वियोगाने पुरुरव्यास उन्माद होतो. तो जनावरांशी बोलतो. झाडाझुडपांना विचारतो राजहंसांचा कलरव म्हणजे उर्वशीच्या नूपुरांची रूमझुम वाटते त्याला. मानस सरोवराकडे जाणा-या हंसांना तो प्रियेची वार्ता विचारतो. आपली आत्यंतिक विनवणीही ते ऐकत नाहीत इतकी का घाई आहे त्यांना मानस सरोवराकडे जाण्याची ? हंसांनी न सांगता ही तो त्यांची चाल निरखत म्हणतो अरे लबाडा, ही डौलदार चाल तू कुठे शिकलास ? माझी प्रिया तर भेटली नाहीना तुला ? मुद्देमालासह चोर पकडला। मी चोरांना शासन करणारा राजा आहे म्हणून लगबगीने हंस मार्ग्यापासून दूर जाउ पाहतोय ! पुढे जाऊन राजा आपली तुलना गजराजाशी करतो आणि तुला प्रियेचा वियोग न

होओ। अशी शुभेच्छाही व्यक्त करतो. विरहभावनेने व्यापलेले त्याचे मन क्षणोक्षणी निसर्गातील प्रत्येक वस्तूत प्रियेचे साम्य शोधीत राहते. तिचे अस्तित्व शोधीत राहते.

शृंगाररस मग तो संभोग असो की विप्रलंभ, - निसर्ग हाच त्याचा उद्दीपनभाव आहे हे निश्चित.

मेघश्यामा दिशोदृष्ट्वा मानसोत्सुक चेतसा ।
कूजितं राजहंसेन नेदं नूपुरशिञ्जितम् ।।३०.४. वि.
सरसि नलिनीपत्रेणापि त्वमावृतविग्रहां
ननु सहचरीं दूरे मत्वा विरौषि समुत्सुकः ।
इति भवतो जायास्नेहात् पृथक् स्थितिभीरुता
मयि च विधुरे भावः कोऽयं प्रवृत्तिपराङ्मुखः ।।३९.४

पुरुरवा व्याकूळ होवून चक्रवाकाला विचारतो. तोउत्तर देत नाही हे पाहून तो पुन्हा विनवितो आपल्या परिस्थितीवरून तरी जगाची परिस्थिती ओळखावी । तलावातील कमलपत्रामुळे प्रियेचा विरह झाला तर घाबरून रात्रभर ओरडत, विलाप करीत राहतोस आणि पत्नीपासून वियुक्त झालेल्या मला मात्र तिची काहीच वार्ता सांगत नाहीस।

चक्रवाक संकेताचा वापर करून येथे कालिदासाने सारा निसर्गच विरह भावनेने व्यापून टाकला आहे. पुरुरव्याने मोर, कोकीळ, हंस, चक्रवाक, भ्रमर, हत्ती, हरीण, पर्वत, नदी, मेघ या सर्वांना उर्वशीचा ठावठिकाणा विचारला. अशा तऱ्हेने शृंगाररसाचा पूर्ण आविष्कार येथे विप्रलंभ रूपात झालेला दिसतो. विप्रलंभ शृंगारासाठी निसर्गाने दिलेले हे फार मोठे योगदान आहे.

अशा प्रकारे मानव आणि निसर्ग हे एकमेकाना पूरक आहेत. दोहोमध्ये परस्पर देवाणघेवाण आहे. मानवाच्या सुखदु:खांनी भारलेला निसर्ग त्याचा साथीदार आहे, साक्षीदार आहे. म्हणूनच निसर्गातील विविध प्रतिमाने वापरून कालिदासाने आपले नाट्यचित्रण जिवंत बनविले आहे. रमणीयता कोणाला आवडत नाही ? ती तर सर्वांना हवीहवीशी वाटते. ती रमणीयता कालिदासाने निसर्गद्वारे नाट्यरसिकांप्रत पोहोचविली आहे.

कालिदासाची दोन नाटके जशी प्रणयप्रधान आहेत तसेच तिसरे "मालविकाग्निमित्र" ही प्रणयप्रधानच आहे. त्यातही शृंगाररसपूर्ण अशी काही निसर्गविलसिते आहेत. विक्रमोर्वशीयाप्रमाणेच संभोगशृंगारापेक्षा ह्यात विप्रलंभ शृंगारच अधिक प्रभावी आहे. राजा अग्निमित्र मालविकेच्या लाभासाठी संपूर्ण नाटकभर खटपट करत असतो. त्यामुळे त्यांचे प्रत्यक्ष मीलन क्वचितच आढळते. फक्त चौथ्या अंकात समुद्रगृहात त्यांची गाठ पडते. तेथे संभोग शृंगाराच्या छटा आहेत. बाकी सर्वत्र विप्रलंभ शृंगारच डोकावताना दिसतो.

स्मयमानमायताक्ष्या: किंचिदभिव्यक्तदशनशोभि मुखम्
असमग्रलक्ष्यकेसरमुच्छ्वसदिव पङ्कजं दृष्टम् १०२ मा.

अर्धोन्मीलित कमल सदृश तिचे सुहास्यवदन मला किंचितकाळच दिसले. आणि मर्दनासाठी ब्रह्मदेवाने विषाने माखलेला बाण तयार केला आहे की काय असे मालविकेचे सौंदर्य आणि तिचे ललित कलेतील कौशल्यपाहून राजाला वाटते. येथे त्याच्या मनातील आत्यंतिक रतिभावना स्पष्ट होते. म्हणून येथे शृंगार रस आहे.

आमत्तानां श्रवणसुभगै: कूजितै: कोकिलानां
सानुक्रोशं मनसिजरुज: सह्यतां पृच्छतेव
अङ्के चूतप्रसवसुरभिर्दक्षिणो मारुतो मे

सान्द्रस्पर्श: करतल इव व्यापृतो माधवेन ।। ४.३ मा.

कानाला गोड लागणा-या किंचित धुंदावलेल्या कोकिळ कूजनाने "प्रेमाची व्यथा सहन होते ना?" असे सहानुभूतिपूर्वक विचारीत, आंब्याच्या मोहराने सुगंधित झालेली आणि मऊ स्पर्श असलेली दक्षिण वायूची झुळूक जणू मायेने हात फिरवावा तशी माझ्या अंगावरून फिरविली आहे.

राजाच्या व्यथेचा विचार करणारा निसर्ग येथे पहावयास मिळतो. कोकीळकूजन, त्याचा तो धुंदावलेला स्वर, आम्रमोहराने सुगंधी बनलेली वा-याची झुळूक राजाची विरह व्यथा सुसह्य करण्याचा प्रयत्न करते आहे.

विसृज सुन्दरि संगमसाध्वसं
तवचिरात्प्रभृति प्रणयोन्मुखो ।
परिगृहाण गते सहकारतां
त्वमतिमुक्तलताचरितं मयि ।। १३.४

हे सुंदरी, या एकांतातील भेटीची मानसिक भीती बाळगू नकोस मी कधीपासूनच तुझ्या प्रेमाची आशा धरून आहे. मी जर आम्रतरुची भूमिका घेतली आहे तर तू अतिमुक्तलतेचे वर्तन मोकळ्या मनाने स्वीकार !

राजाने स्वत:ला सहकारवृक्ष व मालविकेला अतिमुक्तलता संबोधून आपल्या मनातील मीलनाची उत्कट इच्छा स्पष्टपणे बोलून दाखविली आहे. येथे संभोग शृंगाराचा परिचय देण्यासाठी कालिदासाने निसर्गाचा वापर केलेला आहे.

कालिदासाने आपल्या पहिल्या नाटकात आपल्या पूर्वसुरींचा उल्लेख केला आहे व त्यांच्यापुढे आपलीही नवी कलाकृती कितपत लोकांच्या पसंतीस उतरते कोण जाणे ? अशी शंका उपस्थित केली आहे. अशा पूर्वसुरींपैकी एक म्हणजे "भास" ज्याला कविता कामिनीचा "हास" संबोधिले आहे. अशा भासाची एक अविस्मरणीय कलाकृती म्हणजे "स्वप्नावासवदत्तम्" हे नाटक. यामध्येही भासाने रसपरिपोषात्मक केलेला निसर्गाचा वापर लक्षात घेणे जरुरीचे वाटते.

धन्या खलु चक्रवाकवधूः या विरहिता न जीवति।
न खल्वहं प्राणान् परित्यजामि।

खरेच चक्रवाक पक्षाची मादी मोठी भाग्याची. कारण प्रियकरापासून वियोग झाला की ती जिवंतच राहात नाही. मी मात्र माझे प्राण त्यागीत नाही।

येथे चक्रवाकाच्या माध्यमातून आपले उदयनावरील निरतिशय प्रेम आहे हे वासवदत्ता सांगते. येथे विप्रलंभ शृंगार आहे.
एकाकी वासवदत्ता आपल्या प्रियकराच्या भेटीची इच्छा ठेवून आहे. आणि चक्रवाकी मात्र आपल्या प्रियकराचा वियोग झाला की जिवंतच राहात नाही.

कामेनोज्जयिनीं गते मयि तदा कामप्यवस्थां गते
दृष्ट्वा स्वैरमवन्तिराजतनयां पञ्चेषवः पातिताः।
तैरद्यापि सशल्यमेव हृदयं भूयश्च विध्दा वयं
पञ्चेषुर्मदनो यदा कथमयं षष्ठः शरः पातितः।। १.४

मदनाने पूर्वी उज्जयिनीत असतानाच आपले पाची बाण मजवर सोडले होते. त्याचे शल्य अद्याप माझ्या हृदयात आहे तरी सुध्दा हा सहावा बाण मदनाकडे आला कोठून ?
परस्परांच्या मनात प्रेमभावना निर्माण करण्यासाठी निसर्गाने निर्मिलेली एक अद्भुत शक्ती, अद्वय शक्ती म्हणजे मदन. त्याच्या साहाय्याने येथे भासाने विप्रलंभ शृंगाररस साधला आहे. उदयनाचे वासवदत्तेवरील प्रेम ती समोर नसतानाही तिच्या नसण्याने झालेले दु:ख या गोष्टी उदयन उत्कटपणे वर्णन करून सांगतो आहे.

> मधुमदकला मधुकरा मदनार्ताभि: प्रियाभिरुपगूढा: ।
> पादन्यासविषण्णा वयमिव कान्तावियुक्ता स्यु: ।। ३.४

मदाच्या धुंदीत मंदमंद गुंजारव करणारे आणि प्रेमविव्हल प्रेयसींनी ज्यांना आलिंगन दिले आहे असे हे भृंगी आमच्या पायरवामुळे घाबरून, मी जसा माझ्या प्रियतमेपासून दुरावलो आहे तसे आपल्या प्रेयसीपासून दुरावतील.

येथे भ्रमर-भ्रमरी यांच्यातील संभोगशृंगार भासाने सहजपणे चित्रित केला आहे. त्याचबरोबर उदयनाचा विप्रलंभ वर्णिला आहे. इतक्या सहजपणे रसाचे आविष्करण क्वचितच पहावयास मिळते.

कालिदास, भास यांच्या शृं. रसाविष्कारातील निसर्ग पाहिल्यानंतर भवभूतीचे आविष्करण सामर्थ्य विचारात घेणे जरुरीचे ठरते. "उत्तर रामचरितम्" हे भवभूतीचे करुणरसप्रधान नाटक. त्याच्या तिसऱ्या अंकात तमसेच्या तोंडी भवभूतीने नाट्यातील रसासंबंधी एक विधान केले आहे. "मुख्य रस एकच तो म्हणजे करुण. बाकी सर्व रस छटारूपात आहेत. पाण्याची विविध रूपे

मुख्यत्वे पाण्यापासून निर्माण होतात तद्वत करुण रसाच्याच इतर छटा आहेत. याची अधिक चर्चा करुणरसाच्या विवेचन प्रसंगी होणारच आहे. येथे छटारूपात आलेला शृंगार रस प्रथम पाहू -
पहिल्या अंकात २६. २७ या श्लोकात शृंगाराच्या छटा आहेत.

स्मरसि सुतनु तस्मिन्पर्वते लक्ष्मणेन
प्रतिविहितसपर्यासुस्थयोस्तान्यहानि
स्मरसि सरसनीरां तत्र गोदावरी वा
स्मरसि च तदुपान्तेष्वावयोर्वर्तनानि ।। २६. १ उत्तर.

"हे सुंदरी, त्या पर्वतावर लक्ष्मणाने आपली चोख व्यवस्था ठेवल्यामुळे आपण स्वस्थचित्ताने जे दिवस घालविले ते तुला स्मरतात का? तेथील चविष्ट जलाची गोदावरी नदी आठवते का? अन् तिच्या परिसरातील आपले ते स्वैर प्रणयरंजन. ?

येथे पूर्वीच्या प्रेमभावना पुन्हा स्मरत आहेत म्हणून हा प्रत्यक्ष रस नाही परंतु छटारूपातील शृंगाररस आहे.
दोघेही त्या स्मृतीत रंगून गेले आहेत.

किमपि किमपि मन्दं मन्दमासत्तियोगा
दविरलितकपोलं जल्पतोरक्रमेण
अशिथिलपरिरम्भव्यापृतैकैकदोष्णो
रविदित गत यामा रात्रिरेव व्यरंसीत ।।

एकमेकांना बिलगून बसल्याने गालाला गाल भिडलेल्या स्थितीत हळूहळू काही ना काही, बोलण्याच्या ओघात दोघे गप्पात रंगली असता, एकेक हात

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

परस्परांच्या गाढ आलिंगनात गुंतला असता, प्रहरच्या प्रहर कसे लोटले ते समजलेच नाही! अशी रात्रच संपली पण गोष्टी संपल्या नाहीत!

येथे चित्रातील स्थानाचे वर्णन आणि त्यावरून जागविलेल्या स्मृती या उद्दीपन विभाव आणि व्यभिचारी भाव उत्पन्न करतात म्हणून येथे शृंगाररसाची छटा आहे. त्यावेळी अनुभवलेल्या प्रणयस्मृती आजही जशाच्यातशा आठवताहेत. इतका गहिरा शृंगाररस त्याचीही छटाही तितकीच गहिरी! प्रेमिकांना गुजगोष्टी करत असतांना रात्र कधीच संपू नये असे वाटत असते. गोष्टी महत्वाच्या नसतात पण दोघांचे सानिध्य एकमेकांना हवे असते. पण निसर्गाला मात्र थांबता येत नाही. ठराविक कालावधीनंतर रात्र संपून दिवस यावाच लागतो. तरी पण काही रात्री अशा चिरंतन स्मरणात राहतात. त्या काळी प्रत्ययाला आलेला शृंगार रस पुन्हा स्मृतिरूपाने परिणत झाला आहे. रमणीय निसर्ग सानिध्यात पतिपत्नींनी परस्परांवर केलेली प्रेमाची पखरण प्रेक्षकांच्या मनातील प्रेमभावनेची तार सहजगत्या छेडते.

असेच सहज स्वाभाविक चित्रण आढळते ते शूद्रक लिखित "मृच्छकटिक" या संस्कृत नाटकामध्ये.

> उदयन्तु नाम मेघा भवतु निशा वर्षमविरतं पततु
> गणयामि नैव सर्वं दयिताभिमुखेन हृदयेन।। ३३.४

आकाश मेघांनी झाकोळून जाओ अथवा रात्र होओ, अंधारून येओ, पावसाची संतत धार चालू राहो, काहीही झाले तरी प्रियकर भेटीसाठी तळमळणारे माझे मन या कशयाचीही पर्वा करणार नाही!

जितक्या अडचणी अधिक तितकी कार्यपूर्तीसाठी धडपड अधिक या न्यायाने वसंतसेनेचे मन हट्टाला पेटले आहे. ते कोणतीही अडचण मानायला तयार नाही. अशा त-हेची उत्कट प्रेमभावना उचंबळून आली आहे.

आतापर्यंतचा निसर्गाचे प्रेमभावनेला खतपाणी घालणारे प्रेमिकांच्या इच्छा चेतविणारा प्रेमिकांचा सहाय्यक म्हणून आला, परंतु येथे मात्र त्याने विरोधाची भूमिका स्वीकारली आहे. मीलनात अडथळा आणणारा निसर्ग येथे वर्णिला आहे. म्हणूनच हे वर्णन स्वाभाविक वाटते.

आकाशात मेघांनी दाटी केली की प्रेमीजन व्याकूळ होतात. प्रियव्यक्तीच्या भेटीची आस मनात जागते. पाऊस कोसळू लागला की ही आस तीव्र होते. अशा त-हेचे वातावरण म्हणजे प्रेमभावनेला उद्दीपनच. निसर्गाने येथे वसंतसेनेच्या मनात उद्दीपन विभावांद्वारे प्रेमभावना उत्कट केली आहे.
वसंतसेनेचे चारुदत्तावरील प्रगाढ प्रेम प्रस्तुत श्लोकातून सूचित केले आहे.

> एषा फुल्लकदम्बनीप सुरभौ काले घनोद्भासिते
> कान्तस्यालयमागता समदना हृष्टा जलार्द्रालिका
> विद्युद्वारिदगर्जितैः सचकिता तद्दर्शनाकाङ्क्षिणी
> पादौ नूपुरलग्नकर्दमधरौ प्रक्षालयन्ती स्थिता ।। २५. ५

कदम्ब आणि नीप फुलांच्या सुगंधाने भारलेल्या वातावरणात मेघांनी रमणीय केलेल्या वेळी केसातून पाणी गळत आहे अशी ढगांच्या गडगडाटाने आणि मेघांच्या कडकडाटाने भयभीत झालेली ज्याच्या दर्शनाची इच्छा करणारी प्रिय चारुदत्ताच्या घरी आलेली ही प्रसन्न वसंत सेना चिखलाने माखलेले पाय धुऊन दारात उभी आहे.

निसर्गरम्य वातावरणात पावसात भिजून चिंब झालेली प्रणयिनी, प्रियकरापुढे उभी आहे. तिचे वर्णन आणि निसर्गाने निर्मिलेले कामपूरक वातावरण उद्दीपन विभावाना पोषक असेच आहे.

भो मेघ! गंभीरतरं नद त्वं तव प्रसादात्स्मरपीडितं मे
संस्पर्श रोमाञ्चित जात राग कदम्ब पुष्पमुपैति गात्रम I ४७ ५

हे मेघा , तू अधिक गंभीरपणे गरज: तुझ्या कृपेनेच आज कामदेवाने पीडित असे माझे शरीर वसंतसेनेच्या स्पर्शाने रोमांचित आणि संभोगाभिलाषी होऊन कदम्बतरूप्रमाणे प्रफुल्लित होत आहे.

येथे संभोगशृंगारदर्शन स्पष्टपणे होते. गरजणारे मेघ बरसत असतांना कामभावना उद्दीपित होणे आणि प्रियेशी मीलन होणे या गोष्टी मेघामुळे घडल्या असे चारुदत्ताला वाटते. कारण प्रथमच दिवसाला आणि विरही हृदयाला मेघ झाकोळून टाकत आहे. उद्विग्न करीत आहे असे चारुदत्ताला वाटले होते. आणि नेमकी तीच भावना त्या वातावरणात वसंतसेनेच्या मनातही उचंबळून आली. निर्धन चारुदत्त स्वत: आपली इच्छा तृप्त करण्यासाठी धनवान वसंतसेनेकडे जाऊ शकत नाही. त्यामुळे तो केवळ विरह व्याकूळ अवस्थेत आहे. परंतु वसंतसेना अभिसारिका बनून मीलनाच्या उत्कट इच्छेने पावसाची, अंधाराची तमा न बाळगता उलट या वातावरणाने उत्तेजित होऊन चारुदत्ताकडे आली आहे. चारुदत्ताच्या दृष्टीने हा भाग्यक्षण त्या निसर्गनिर्मित वातावरणामुळे आपल्या वाट्याला आला. म्हणून तो संभोगक्षणी देखील मेघाला सांगतो आहे की बाबा आणखी गरज आणखी बरस। कामाने पीडित माझे शरीर प्रियेच्या आलिंगनाने रोमांचित झाले आहे. पावसाने कदंबवृक्ष फुलतो या संकेताचा वापर येथे

येथे केलेला आढळतो. शूद्रकाने रंगविलेला हा संभोगशृंगार निसर्गाच्या पार्श्वभूमीवर रसिकमनातही रतिभावना निर्माण करणारा आहे. असे म्हटल्यास वावगे होणार नाही।

विप्रलंभ शृंगारातील उद्दीपन विभावांसाठी निसर्गाचा वापर केलेला वारंवार दिसतो. परंतु संभोगशृंगारासाठी निसर्गाचा इतका सुरेख वापर शूद्रकाने केलेला आढळते.

यातील शृंगारात ओढून ताणून प्रसंग किंवा रमणीयता आणलेली नाही तर ती नैसर्गिक रम्यता आहे.

धन्यानि तेषां खलु जीवितानि ये कामिनीनां गृहमागतानाम्
आर्द्राणि मेघोदकशीतलानि गात्राणि गात्रेषु परिष्वजन्ति।। ४९.५

अशा त-हेने नायकाला दुर्दिन भासणारा तो दिवस सुदिनात रूपांतरित झाला हो सारी निसर्गाची किमया, नैसर्गिक भावनेचा विजय.

आतापर्यंतच्या संस्कृत नाटकातील शृंगाररस परिपोषात्मक निसर्गाची उदाहरणे पाहिली त्यावरून नाटककारांना संभोग शृंगारासाठी उद्दीपन विभाव, व्यभिचारी भाव म्हणून निसर्गाचे साहाय्य अत्यावश्यक वाटले नाही परंतु विप्रलंभ शृंगारासाठी मात्र ते आवश्यक आणि अटळ वाटले.

निसर्गाची ही विविध मनोहारी रूपे सिध्दहस्त नाटककारांच्या उच्च अभिरूचीचे आणि सूक्ष्म अवलोकनाचे फलित म्हणावे लागेल.

शृंगारापाठोपाठ नाट्यामध्ये अधिक प्रमाणात आढळणारा रस म्हणजे 'करूण-रस' होय.

"कारुण्यम् भवभूतिरेव तनुते" या न्यायाने प्रथम उत्तररामचरितातील सूत्रधाराने नाटककार फिरविलेला करुणारस अर्थात त्यासाठी निसर्गाने दिलेले योगदान पाहणे उचित ठरेल.- करुणारस हाच नवरसात एकमेव रस आहे असे भवभूती मानतो.

एको रस: करुण एव निमित्तभेदाद्भिन्न: पृथक्पृथगिवाश्रयते विवर्तान्
आवर्त बुद्बुदतरङ्गमयान्विकारानम्भो यथा सलिलमेव हि तत्समस्तम् ।४७.३

शोक हाच एकमेव रस असून निमित्तवशात तो वेगवेगळी रूपे धारण करतो। भोवरे, बुडबुडे, लाटा इ. भिन्न रूपांतरे झाली तरी शेवटी ते सर्व जलच।

हे विधान विशेषकरून रामचरित्राला लागू पडते. त्याचा शोक मधून मधून शृंगार,वीर, अद्भूत अशी रूपे घेत असला तरी त्यातील अंत:प्रवाह करुणाचाच असतो. या नाटकात शृंगार वीर इ. विविध रसांचा प्रासंगिक आविष्कार दिसत असला तरी त्या सर्व प्रसंगात, कथानकात ही करुणा हाच रस प्रधान आहे. असे स्वत: भवभूती तमसामुखातून प्रेक्षकांना आवर्जून सांगतो.

शोक ही भावना प्राथमिक मानलेली नाही. प्रीती, संघावृत्ती पालनवृत्ती इ. अभिमत वृत्तींच्या सहचर भावना इष्ट विषय नाशाने किंवा वियोगाने प्रबुद्ध झाल्या व माणूस प्रतिकाराला असमर्थ झाला म्हणजे शोक किंवा दु:ख ही भावना उद्भिन्न होते.
मुळात प्रेम असल्याखेरीज शोक उत्पन्न होणार नाही.
या संदर्भात एक ग्रामीण म्हण अशी -

"जाळाशिवाय कढ नाही मायेशिवाय रडं नाही"

म्हणून शोक हा व्यभिचारी भाव. शोकाची भावना साधित,स्वतंत्र भावनेचा आधार सहानुभूती नावाने दिला. व तो स्थायिभाव मानला गेला.

उत्तररामचरिताची सुरवात सुखासंवादात असली तरी मध्यातच करुणरसाला प्रारंभ होतो. सीतात्यागानंतर रामाचे स्वगत याबाबतीत अत्यंत बोलके ठरते.

"अपूर्वकर्मचाण्डालमयि मुग्धे विमुञ्च माम्।
श्रितासि चन्दन भ्रान्त्या दुर्विपाकं विषद्रुमम्।। ४६. १

हे भोळ्या भाबड्या स्त्रिये, पूर्वी कधीही न घडलेले असे दारुण कृत्य करणाऱ्या माझा तत्काळ त्याग कर. चंदनवृक्ष समजून तू परिणामी महाभयंकर अशा विषवृक्षाला कवटाळले आहेत। ज्याच्याकडून सौख्याची शीतलतेची सुगंधाची अपेक्षा करावी तो विषवृक्ष निघावा ज्याच्या केवळ सामिप्याने ही विषबाधा व्हावी अशा वृक्षाच्या जोडीला राम स्वतःला नेऊन बसवितो. आतापर्यंत सीतेच्या दृष्टीने हा चंदनवृक्षच होता. पण आता या कृत्यामुळे तोच वृक्ष विषवृक्ष बनला. आणि विषवृक्षाला जवळ केल्याचा परिणाम दुसरा काय होणार ?

रामाच्या मनातील पराकोटीचे दुःख आणि सीतेची कायमची ताटातूट दर्शविण्यासाठी भवभूतीने निसर्गातील अगदी योग्य व चपखल उदा. शोधून काढले आहे. सीतात्यागाच्या कल्पनेतील गहिरे दुःख एका नैसर्गिक उदाहरणाद्वारे भवभूतीने चितारले आहे. चंदनवृक्षाजवळ त्याच्या शीतलतेची अपेक्षा करून जावे. त्याच्या दुसऱ्यासाठी झिजण्याच्या स्वाभाविक गुणधर्माची कास धरून जावे आणि त्याला कवटाळताच त्याच्याशी जवळीक साधताच तो चंदनवृक्ष नसून विषवृक्ष असल्याचे जाणवावे. हा घोर अपेक्षाभंग। हाच सीतेच्या वाट्याला येणार आहे. सीतेच्या दृष्टीने तिला सुखाविणारा, प्रणयाची साक्षी देणारा, सहवासाचा परिमल देणारा,

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

वाणीद्वारे स्निग्ध शीतलता पाझरणारा असा राम सीतेचा सारसर्वस्व असलेला असा रामच आज तिला दारुण दुःखाच्या खाईत लोटणार होता. ते ही त्याच्या नकळत नव्हे तर सर्व काही माहीत असून उमजून! म्हणूनच येथे अपरंपार दुःखातिशयाने राम वरील उद्गार काढतो. सीतेच्या या दुःखावस्थेला सर्वस्वी मी जबाबदार आहे आणि मी एखाद्या विषवृक्षासारखा आहे" । चंदनवृक्ष आणि विषवृक्ष यांच्या रूपाने भवभूतीने करुणरसाला उठाव देण्यासाठी निसर्गाची योजना केली आहे. चंदनवृक्षाच्या ठायी असणारे निसर्गदत्त गुण रामाच्या ठायी आहेतच. पण रामाचे सीतात्यागाचे कृत्य हे चंदनवृक्षाला शोभणारे नाही तर ते एखादया विषवृक्षाला शोभणारे आहे. हे भवभूतीला येथे स्पष्ट करावयाचे आहे. प्रत्यक्ष रामाने स्वतःची निर्भर्त्सना करणे यातून त्याचा उत्कट शोक प्रकट होतो. व हाच करुणरसाचा स्थायीभाव आहे. शृंगारालापरिपोषक म्हणून जसा निसर्ग येतो. तसाच तो येथे करुणरसाचा परिपोष करण्यासाठी आलेला दिसतो.

"शून्यमधुना जीर्णारण्यं जगत् " सीतेवाचून हे जग आता वैराण, वठलेल्या अरण्यासारखे आहे. असे रामाला वाटते. आता वसंत आला तरी हे वन फुलणार नाही. तद्वत रामाचे जीवन आता कायम विषण्णच राहील. केवढी ही करुणता!

पुढे शंबूकवधासाठी गेलेला राम दिव्यदेहधारी शंबूकासमवेत दंडकारण्यात प्रवेश करतो. तेव्हा त्याच्या पूर्वस्मृती स्पष्टपणे जागृत होतात.

> चिराद्वेगारम्भी प्रसृत इव तीव्रो विषरसः
> कुतश्चित्संवेगात प्रचल इव शल्यस्य शकलः ।
> व्रणो रूढग्रंथिः स्फुटित इव हृन्मर्मणि पुन
> र्घनिभूतः शोको विकलयति मां नूतन इव ।।

दण्डकारण्यातील वास्तव्य, जटायुची स्मृती, रमणीय वन प्रदेश, पंचवटी आणि तेथील प्रत्येक वस्तू पशुपक्षी प्रणयाचे साक्षीदार पाहून वियोगी रामाचा शोक पुन्हा उफाळून येतो.

अनेक वर्षानंतर वेगाने उफाळणारा हा घट्ट गोळा बनलेला शोक विरघळून मला हतबल करतो आहे.

एक प्रकारे निसर्गाचेच हे सामर्थ्य आहे. जो शोक घनरूप घेऊन हृदयात दडला होता त्याला पुन्हा विरघळविणे, द्रवरूप करणे जखम वाहवणे हे त्या निसर्गाचेच काम. त्याचेच सामर्थ्य.

भवभूतीच्या या करुणरसप्रदर्शनात निसर्गाने फार मोलाची भर घातलेली आहे. पूर्वी वनवासकाळातही सीतेसह दंडकारण्यात वास करीत असतांना जो निसर्ग मन रिझविणारा होता तो पुन्हा सीतात्यागानंतर स्मृतींना चाळविणारा, शोक वाढविणारा होऊन पुढे उभा ठाकला आहे. जशी पार्श्वभूमी हवी तसा निसर्गातही बदल करून घेणे हे भवभूतीचे कौशल्य आहे. सीतेच्या विरहाचे दुःख अनावर झाले म्हणून राम दंडकारण्यात प्रवेशला नाही तर एका दुसऱ्याच कामासाठी तो तेथे आला आणि पूर्वपरिचित ठिकाणे पाहून त्याने मनाच्या तळकप्प्यात दडविलेला शोक उफाळून वर आला. म्हणजेच करुणरसाचे सूत्र निर्वेधपणे येथेही शिरकाव करते झाले. पुढे छाया अंकात सीतेचे वर्णन भवभूती साक्षात करुणाची मूर्ती किंवा साकार झालेली विरहव्यथा असे करतो.

तमसेच्या तोंडून सीतेची शोकविकल अवस्था भवभूतीने साकार केली आहे.

किसलयमिव मुग्धां बन्धनाद्विप्रलूनं
हृदयकुसुमशोषी दारुणो दीर्घशोकः।
ग्लपयति परिपाण्डु क्षाममस्याः शरीरं
शरदिज इव घर्मः केतकीगर्भपत्रम् ॥ ५.३

शरदृतुतील उन्हाने केवडयाच्या अंतर्भागातील पाकळोला कोमेजून टाकावे त्याप्रमाणे हा महाभयंकर दीर्घकालीन शोक जो केव खुडल्याने हृदयपुष्प सुकविणारा ठरला आहे आणि हिच्या फिकट व कृश शरीराला ग्लानी आणीत आहे.

केवडा हा अतिशय नाजुक. त्याला उन्ह सोसत नाही आणि शरदातील उन्ह हे केवढे तापदायक। साध्या उन्हाने देखील कोमेजणारी केतकी शरदाच्या उन्हात कशी होत असेल याचे निरीक्षण केल्याशिवाय अशा त-हेची उपमा सीतेला देणे सीतेच्या सद्यस्थितीचे वर्णन करुणावस्थेचे वर्णन करणे भवभूतीला शक्य नव्हते. म्हणजेच येथे भवभूतीच्या सूक्ष्म निरीक्षण शक्तीचा प्रत्यय येतो.

शंबुकाबरोबर तीच तीच वने पुन्हा पाहण्याचा प्रसंग आला असता विरहव्याकूळ होऊन रामाची झालेली दयनीय अवस्था पाहिली ती निसर्गानेच। तेथली नदी, पर्वत, वने, गोदावरीचा रोडावलेला प्रवाह जेथे पंचवटीत प्रियेस कालक्रमणा केली तेथील पंचवटीकडे एकटा प्रियाहीन-राम पाहू तरी कसा शकेल आणि जिच्या ठायी प्रियेच्या गोड स्मृती निगडीत आहेत. तिला टाळून पुढे तरी कसा जाऊ शकतो ? रामाला दुःखातिरेकाने मूर्च्छा येणे, त्याचे अश्रु ढाळणे . अशा त-हेचे अनेक प्रसंग निसर्गाने मूकपणे पाहिले आहेत. शृंगाररसपरिपूर्ण प्रसंग काय किंवा सीतेचा

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

त्याग काय, रामाचा वियोगविरह काय या सर्वांचा साक्षीदार आहे हा निसर्ग।

पुढे या निसर्गाचे करुणारसपरिपूर्ण रूप दिसते ते चौथ्या अंकात.

"हृदि नित्यानुषक्तेन सीताशोकेन तप्यते
अन्त: प्रसृप्तदहनो जरन्निव वनस्पति: ।। ४.२

राजा जनकाच्या मनात धुमसणारा शोकाग्नी मिश्रविष्कंभकातील भाण्डायनाद्वारे भवभूतीने वर्णिला आहे. त्याच्या अंत:करणात सीताविषयक दु:ख कायमचे घर करून बसले आहे. त्यामुळे तो त्या दु:खाने आहोळून जात आहे. त्याच्या या अवस्थेचे वर्णन "अंतर्भागात धुमसणाऱ्या अग्नीने वठलेला वृक्ष करपून जातो" अशा शब्दात केलेले दिसते. जनकाच्या हृदयाला जाळणारे सीताविषयक दाहक दु:ख हीच जनकशोकाची परिसीमा आहे.

आपली कन्या सीता [illegible] तिच्यावर ओढवलेल्या संकटाने जनकाच्या मनाला होणारे क्लेश भवभूतीने येथे निसर्गातील उदाहरणाद्वारे व्यक्तविले आहेत. तपोधन विदेही राजा ही आपल्या अंत:करणात दु:खाची खाई साठवून दु:खी होतो आहे. दु:खाग्नीत होरपळत आहे. आपल्या ढोलीत धुमसणारा अग्नी बाळगणारा जीर्णवृक्ष करपून जातो त्याप्रमाणे राजा जनकही दु:खाग्नीने होरपळून गेला आहे.

भासाच्या स्वप्नवासवदत्तम् या नाटकात ही विप्रलंभ शृंगार हा प्रधान रस असून करुण रसाच्या छटा आल्या आहेत. त्यातील निसर्गाचा सहभाग पुढील श्लोकाद्वारे आढळतो.

नैवेदानी ताद्गाश्चक्रवाका
नैवाप्यन्ये स्त्रीविशेषैर्वियुक्ता:
धन्या सा स्त्री यां तथा वेत्ति भर्ता
भर्तृस्नेहात् सा हि दग्धाप्यदग्धा ॥१३॥ १

चक्रवाक पक्षीयुगुल हे एक आदर्श प्रेमी युगुल मानले आहे. एका कमलपत्रामुळे यांना वियोग अवस्था प्राप्त होते. आणि ते दोघे रात्रभर एकमेंकसाठी आक्रोश करीत असतात. अशा त-हेचा आत्यंतिक वियोग त्यांना भोगावा लागतो. पण त्यांचे वियोगकालीन दु:ख सुध्दा उदयनाच्या दु:खापुढे फिके पडले. तो चक्रवाक सुध्दा अशाप्रकारचा शोक आपल्या प्रियेसाठी करीत नसेल. इतका राजा उदयन शोकाकूल झाला आहे. असे तपोवनात आलेला एक पाहुणा ब्रह्मचारी सांगतो आहे.

येथे करूणरसाचे छटात्मक दर्शन आहे. कारण वासवदत्ता मरण पावली आहे असे समजून राजाने केलेल्या शोकाचे वर्णन येथे आले आहे. म्हणून त्याचे वासवदत्तेवरील आत्यंतिक प्रेम आणि त्यामुळे निर्माण झालेला आत्यंतिक शोक यातून करूणरस डोकावतो. आत्यंतिक विरह निर्माण झाल्यामुळे हा विप्रलंभ शृंगार नाही. पुढे वासवदत्तेच्या तोंडी ही हीच कल्पना आलेली आहे.

"धन्या खलु चक्रवाकवधू: या विरहिता न जीवति।"

अशा त-हेने करूणाजनक उद्‌गार ती काढते.
कालिदासाची नाटके प्रणयप्रधान असल्याने शृंगाररसपूर्ण आहेत. वीर हास्य, अद्भूत रसाचे दर्शन नायक राजा असल्याने तो इंद्राचा सहाय्यक असल्याने वीर, अद्भुत रसाचे दर्शन घडते. विदूषकाचे पात्र प्रत्येक नाटकात असल्याने हास्यरसही स्वाभाविकपणे येतो. परंतु करूणरस मात्र त्याच्या नाटकात

दिसत नाही. या नाटकात सर्व रसांचा समावेश आहे. रसपरिपोषात्मक निसर्गच आपल्याला येथे विचारात घ्यावयाचा आहे.

विनिवर्तित एत वीरपोत: पृतनानिर्मथनात्त्वयोपहूत:
स्तनयित्नुरवादिभावलीनामवमर्दादिव दृप्त सिंहशाव: ।। ८.५

सैन्याचा फडशा पाडण्याच्या कार्यापासून हा वीर छावा तू हाक मारल्यामुळे मागे फिरला एखादा गर्विष्ठ सिंहाचा बच्चा मेघगर्जना ऐकून हत्तींच्या समुदायाचे कंदन करण्याचे सोडून परत फिरावा तसा हा परत फिरला आहे.

असे शूर सिंहाचा छावा हा लहान असला तरी हत्तींचा सरदाराला, प्रमुखाला ही नामोहरम करु शकतो. हे निसर्गात नेहमी दिसणारे उदा. पशुसृष्टीत नेहमी येणारा अनुभव येथे लवाला पाहून सुमंत मंत्र्यांनी बोलून दाखविला त्यावरुन लवाची एकंदर ऐट, त्याचा पराक्रम आणि वीरवृत्ती स्पष्ट होते. चंद्रकेतूशी सैन्य प्रमुखाशी लढण्याच्या तयारीत असलेल्या लवाचे वर्णन म्हणजे साक्षात वीररसाचे वर्णन म्हणावे लागेल.

अयं शैलाघात क्षुभित वडवा वक्त्र हुतभुक्
प्रचण्डक्रोधार्चिर्निचय कवलत्वं व्रजतु मे ।
समन्तादुत्सर्पन्घन तुमुल हेला कलकल :
पयोराशेरोघ: प्रलयपवनास्फालित इव ।। ९.५

पर्वताघाताने प्रक्षुब्ध बनलेल्या वडवाग्नी प्रमाणे माझ्या प्रचंड क्रोधाग्नीचा ज्वालासमूहांच्या भक्ष्यस्थानी हा चोहोकडून उठणारा घनघोर सैन्यनाद पडू दा ! प्रलयकालीन झंझावाताने उसळलेल्या सागराच्या लाटा वडवानलाच्या भक्ष्यस्थानी पडाव्यात त्याप्रमाणे.

लवाचे हे आवेशयुक्त उद्गार वीररसाची परिसीमा होय. वयाने लहान असला तरी वडवानलाचे सामर्थ्य त्याच्या क्रोधात आहे. आणि क्रोधाच्या भरात त्यानी सैन्यनाद पडू दे अशी शौर्याची भाषा तो वापरतो.

> दृष्टिस्तृणीकृत जगत्रयसत्वसारा, धीरोध्दता नमयतीव गतिर्धरित्रीम् ।
> कौमारकेऽपि गिरिवद्गुरुतां दधानो वीरोरस: किमयमेत्युत दर्प स्व ।

तिन्ही जगातील सामर्थ्याचे सारसर्वस्व तुच्छ लेखणारी दृष्टी, आवेशयुक्त धीरगंभीर अशी, पृथ्वीला पायाखाली वाकविणारी चाल, कुमारवयातच पर्वताप्रमाणे गुरुत्व अंगी धारण करणारा हा वीररसच प्रत्यक्ष रूपात प्रकटला आहे की साक्षात गर्व ? भवभूतीची आवडती कल्पना साक्षात रस प्रकट होणे ही कल्पना सीतेच्या बाबतीतही आली आहे.

वीररसाच्या परिपोषासाठीही निसर्ग दत्त म्हणून उभा आहे.

उत्साह हा त्याचा स्थायी भाव.

उत्तर रामचरितामध्ये वीररसाचा परिपोष स्पष्टपणे झालेला दिसतो.

> ज्या जिह्वया वलयितोत्कटकोटि दंष्ट्र
> मुद्गरि घोर घन घर्घर घोषमेतत् ।
> ग्रासप्रसक्तहसदन्तक वक्त्रयन्त्र
> जृम्भाविडम्बि विकटोदरमस्तु चापम् ।। २९.४

आपल्या प्रत्यंचारूपी जिभेने विक्राळ टोकांच्या दाढांना चाटीत असलेले मेघगर्जनेप्रमाणे भयंकर नाद निर्माण करणारे माझे हे धनुष्य हसत हसत घास गिळणाऱ्या कृतांत काळाच्या प्रचंड पोकळीने युक्त अशा मुखयंत्राच्या

जांम्हईचे अनुकरण करणारे होओ।

कुमार लव हा इतर बटूंच्या भयविस्मित बोलांनी अधिकच उत्साही बनला आहे. आणि वरील आशयाचे उद्गार काढून आपल्याजवळील वीरोचित सामर्थ्याचे बालवयातच दर्शन घडवित आहे.

तसेच अभिज्ञान शाकुन्तलातील हा वीररस दर्शन घडविणारे हे ठिकाण --

यो हनिष्यति वध्यं त्वां रक्ष्यं रक्षति च द्विजम्
हंसो हि क्षीरमादत्ते तन्मिश्रा वर्जयत्यपः

राजा दुष्यन्त आवेशाने म्हणतो आहे "माझ्या धनुष्याला मी असा बाण लावतो की जो वध्य असा तुझा वध करील आणि रक्षणीय ब्राह्मणाचे रक्षण करील. हंस दूध काढून घेतो, आणि त्याच्यात मिसळलेले पाणी टाकून देतो.

हंसाची नीरक्षीरविवेकता आपल्या बाणात आहे हे मोठ्या उत्साहपूर्ण स्थितीत दुष्यन्त सांगतो.

राजा पुरूरवा म्हणतो --

अनेन रथवेगेन पूर्वप्रस्थितं वैनतेयमपि आसादयेयम्. किं
पुनस्तमपकारिणं मघोन: --

रथाच्या या अतिवेगाने माझ्या आधी निघालेल्या गरूडालाही मी पकडू शकतो मग त्या केशी नामक दैत्याचा काय पाड ?"

राजाचे हे उद्गार वीरसपूर्ण असून आपल्या रथवेगाची कल्पना यावी म्हणून गरूडभरारीचे उदा. दिले आहे. इतर सर्व पक्षांहून गरूड हा अतिवेगवान आकाशगामी

पक्षी मानला आहे. आणि पुरूरव्याचा सोमदत्त नावाचा रथ ही आकाशगामी होता हे दर्शविण्यासाठी येथे निसर्गाची मदत घेतली आहे.

वत्सलरस - श्रीरामाविषयी कौसल्येच्या मनात असलेला वत्सलरस येथे ओतप्रोत भरून वाहताना दिसतो.

अहो न केवलं दरविकसन्नीलोत्पल श्यामलोज्ज्वलेन देहबन्धेन कवलितारविन्दकेसरकषाय कण्ठ कलहंस निनाद दीर्घ दीर्घेण स्वरेण च रामचन्द्रमनुहरति ननु कठोरकमल गर्भपक्ष्मल: शरीरस्पर्शोऽपि तादृश एव वत्सस्य ।

किंचित उमललेल्या नीलकमला सारख्या सावळ्या उजळ अंगलटीने केवळ नव्हे तर कमळपराग भक्षणाने तुरट झालेल्या कंठाने गोड असा हंस कूजनासारख्या आपल्या दीर्घस्वराने हा मुलगा रामचंद्राचे अनुकरण करीत आहे. तसेच पूर्ण विकसित कमळाच्या अंत:कोशाप्रमाणे मृदुल असा याचा देहस्पर्श हा ही त्याच्यासारखाच विकसित आहे.

आपल्या प्रियपुत्राच्या परिसस्पर्शाचा पुन:प्रत्ययानंद येथे कौसल्याराणी त्या बालकाच्या स्पर्शाने मिळवीत आहे. पुत्राविषयीचे वात्सल्य, दोघांतील साम्य दाखविण्यासाठी भवभूतीने आपली कल्पनाशक्ती पणाला लावली आहे. प्रत्यक्षस्पर्श न होता ही डोळ्यापुढे येणारे परागकण, कमळ, त्याचा अंत:कोश यांची मृदुलमृदुतरता वाचकांच्या मनाला मोरपिशी स्पर्श करून जाते. हे भवभूतीचे निसर्गाशी समीपतेचे नाते नव्हे काय ?

अथ कोऽयमिन्द्रमणिमेचकच्छवि --
र्ध्वनिनैव बध्दपुलकं करोति माम् ।
नवनील नीरधर धीरगर्जित --
क्षणबध्दकुड्मलकदम्बडम्बरम् १७. ६ उत्तर

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

इंद्रनील मण्याप्रमाणे निळसर कांती असलेला हा कोण मला केवळ आपल्या शब्दांनी रोमांचित करीत आहे ? त्यामुळे नव्या कृष्णमेघाच्या गंभीर गर्जनेने क्षणात कळ्याधारण करणाऱ्या कदंबाची शोभा मला प्राप्त करून दिली आहे.

पुत्र भेटीचे आपले मनोरथही सफल होणार आहेत असा येथे रामाच्या वरील बोलण्याचा आशय आहे. कृष्णमेघाचे वर्णसादृश्य, गंभीरगर्जना, जी अनाठायी नाही, कदंबाना कळ्या आणणारी राममनात आशेची कळी अंकुरली मेघ बरसला की कळीचे फूल होणार वृक्षाची आपल्या फुलाविषयीची जी भावना ती येथे रामाची मुलाविषयीची प्रीती म्हणून येथे निसर्गाच्या सहकार्याने वत्सल रसाची निर्मिती केलेली आहे. असे वाटते.

शृंगार, करूण, वीर, वत्सल याप्रमाणे रौद्ररसाची ही काही ठिकाणे नाटकामध्ये आहेत. निसर्गाने रौद्ररसाचाही परिपोष केला आहे. त्यासाठी शाकुंतलातील पाचव्या अंकातील उदा. पाहू. रौद्ररसाचा स्थायीभाव क्रोध.

इदानीमन्यो धर्मकंचुक प्रवेशिनस्तृणाच्छन्न कूपोपमस्य
तवानुकृतिं प्रतिपत्स्यते ।

गवताने झाकलेल्या विहिरीप्रमाणे धर्माचे वरून नुसते पांघरूण ज्याने घेतले आहे, अशा तुझी बरोबरी दुसरा कोण करू शकेल ?

अत्यंत क्रोधाविष्ट होऊन शकुंतलेने राजाविषयी वरील उद्गार काढले आहेत. गवताने विहीर झाकणे हे मानवाच्या बुध्दीचे काम त्याला पशू बळी पडतात. तसे येथे एका नागर राजाने भोळ्या शकुंतलेला फसवले

आहे." आणि हे स्वत: शकुंतला सांगते आहे. म्हणजे जाणून बुजून आपल्याला जाळ्यात अडकवून फसविण्याचा कट राजाने केला आहे या विचाराने, आपल्या निस्सीम प्रेमाची प्रतारणा सहन न होवून वरील उद्गार ती काढते. येथे नि:संशय रौद्ररस आहे.

विस्मय हा स्थायी भाव असलेला अद्भूत रस ही काही ठिकाणी आपल्याला दिसतो.

"जृम्भस्व सिंह दन्तांस्ते गणयिष्ये" - अरे सिंहा तोंड उघड तुझे दात मोजणार आहे मी!

सिंहाचे दात एका षड्वर्षीय बालकाने मोजणे ही घटना विस्मयकारक आहे. सिंहासारखा क्रूर पशू, त्याला बाळपणीच काबूत ठेवण्याचे त्याचे सामर्थ्य विस्मित करून टाकते. म्हणून येथे अद्भुत रस आहे. असाच किंबहुना याहून अधिक परिपुष्ट असा अद्भुत रस उत्तररामचरितात दिसतो.

अरुन्धति जगद्वन्द्ये गङ्गापृथ्व्यै जुषस्व नौ
अर्पितेयंतवावाभ्यां सीता पुण्यव्रता वधू: ।। १५.७

जगतालावंदनीय असलेला हे अरुंधती, आम्हा गंगा, पृथ्वींना अनुमती दर्शव किंवा साहाय्य कर. ही पुण्यशील अशी तुझी सून सीता आम्ही तुझ्या हवाली करीत आहोत. प्रत्यक्ष गंगानदी व पृथ्वी यांनी नाटकीय पात्रांप्रमाणे एक पात्र होवूनच बोलणे ही घटना विस्मयकारक आहे म्हणून येथे अद्भुत रस आहे.

मन्थादिव क्षुभ्यति गाङ्गमम्भो
व्याप्तं च देवर्षिभिरन्तरिक्षम् ।
आश्चर्यमार्या सह देवताभ्यां
गङ्गा महीभ्यां सलिलादुदेति ।। १६.७

गंगेचे पाणी घुसळल्याप्रमाणे क्षुब्ध होत आहे व देव ऋषी यांनी अंतराळ व्यापून टाकले आहे काय हे आश्चर्य, की गंगा व पृथ्वी यांच्यासमवेत सीतादेवी पाण्यातून वर येत आहे !

नदीतून सीता कोणत्याही प्रकारची इजा न होता वर येणे आणि प्रत्यक्ष नदी व पृथ्वी यांनी प्रकट होणे ही घटना विस्मयकारक आहे म्हणून येथे ही अद्भुत रस आहे.

निष्कूजस्तिमिता: क्वचित्क्वचिदपि प्रोच्चण्ड सत्व स्वना:
स्वेच्छा सुप्तगभीरभोग भुजगश्वास प्रदीप्ताग्नय: ।
सीमान: प्रदरोदरेषु विरलस्वच्छाम्भ सो यास्वयं
तृष्यद्भि: प्रतिसूर्य कैरजगर स्वेद द्रव: पीयते ।।१६. २

कोठे शब्दहीन स्तब्धता तर कोठे श्वापदांच्या प्रचंड गर्जनांनी युक्त असे, सुस्त झोपलेल्या विक्राळ फणायुक्त सर्पांच्या फूत्कारांनी वणवे पेटलेले असे व-यात अल्प स्वच्छ जलसंचय असलेले हे सीमाप्रदेश -"यामध्ये तहानलेल्या सरडयाकडून अजगराच्या घामाचे जल प्यायले जाते"! शंबूकाने केलेले येथील निसर्गवर्णन हे भयानक रसाचे दर्शन होय.

असेच मृच्छकटिकातील एक ठिकाण -

चिन्ता सक्त निमग्नमन्त्रि सलिलं दूतोर्मिशङ्खाकुलं
पर्यन्तास्थित चारनक्र मकरं नागाश्वहिंस्त्राश्रयम् ।
नानावाशक कङ्क पक्षिरुचिरं कायस्थ सर्पास्पदं
नीतिक्षुण्णतटं च राजकरणं हिंस्त्रै : समुद्रायते ।।१४. ९

विचारविनिमयात गढलेले मंत्रीच ज्यामधील जल आहेत, दूतरूपी लाटा किंवा भोवरे यांनी जे भरगच्च भरले आहे, चारहिशाना पसरलेले गुप्तचर म्हणजे सुसरीमगरी आहेत. जेथे हत्ती घोडयांसारखे भयंकर प्राणी आहेत. जो ब-याच त-हांनी बोलणा-या पक्ष्यांनी भरलेला आहे., जेथे कायमस्वरूपी

सर्पांचे घर आहे. ज्याची मर्यादा संपुष्टात आली आहे अशी राज्नी ती अशा या लोकांच्यामुळे ती सागरासारखी भासते आहे. जिचा थांग लागत नाही. अशा राज्नीतीचे भयानक स्वरूप समाजापुढे शूद्रकाने उभे केले आहे. निसर्गातील भयप्रद गोष्टी घेऊन हे चित्र साकार केले आहे.

सर्व रसांच्या दृष्टीने विचार करता रसपरिपोषात्मक निसर्ग हा शृंगाराला जेवढा सजवितो तेवढा तो कोणत्याच रसाला सजवीत नाही. किंबहुना काही रसांत निसर्ग आढळतच नाही शृंगाराखालोखाल करूण रसाचा परिपोषक निसर्ग आढळतो तो ही उत्तरराम चरितातच. वत्सलरस आणि वीर रसातील निसर्गही उत्तररामचरितातच पहावयास मिळतो बाकी सर्व संस्कृत नाटकात शृंगार, वीर, करूण हेच रस अधिक प्रमाणात आढळतात. बाकीच्या नाटकात इतर रस आढळतील पण त्यांचा परिपोषक निसर्ग म्हणून वापर झाला नाही.

xxxxx